दिनांक ०४/०१/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने " **Best Detection of the Month** " **माहे नोव्हेंबर २०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर – २०२०

| | | |
|---|---|---|
| **०१** | **डोंगरी पोलीस ठाणे, परिमंडळ–०१** | **गु.र.क्र. १५४/२०२० कलम ४१९, ४२०, ३४ भादवि सह कलम ६६(क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान सुधारीत कायदा–२००८** |

**–: ' समाज माध्यम (फेसबुक, व्हॉटस्अॅप) द्वारे केलेली फसवणूक ' ':–**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :–** नमुद गुन्हयात फिर्यादी श्री. प्रकाश नारायण जाधव, वय ४० वर्षे, यांची मर्सी ग्रेस या अमेरिकन महिलेशी फेसबुक द्वारे ओळख झाली होती. सदर महिलेने फिर्यादी यांचेशी चॅटिंग करताना अमेरिकन मिलीटरीमध्ये कॅप्टन या पदावर असून सध्या अफगानिस्तान येथे पोस्टिंगकरिता असल्याची बतावणी केली तसेच फिर्यादी यांच्याशी व्हॉटस्अॅप नंबर 1) +44-7466711286, 2) +44–7448048217, 3)+44–7438506340 या क्रमांकावरून संपर्क साधून तिच्याकडे आठ लाख अमेरिकन डॉलर असल्याचे सांगीतले. तसेच भारतात शॉपिंग मॉल सुरू करण्याची योजना असल्याचे सांगितले.

त्याचवेळी फिर्यादी यांच्याकडेही पैसे असल्याने फिर्यादी देखील स्वत:चे पैसे गुंतवण्यास तयार झाले. अमेरिकन महिला मर्सी ग्रेस यांनी त्यांची रक्कम भारतात पाठवित असल्याचे सांगून इसम नामे जॉन केनेडी, यांचा ७८३८०२४१९४ हा मोबाईल क्रमांक दिला होता. जॉन केनेडी, याने फिर्यादीस सदरची रक्कम दिल्ली एअरपोर्ट येथे कस्टम क्लिअरन्स होत नसल्याचे सांगून अन्य एक महिला अनिता चौधरी हिचा मो. क्र. ८९२९९०१५३५ यावरून संपर्क साधून कस्टम क्लिअरन्ससाठी फिर्यादी यांना रक्कम भरण्यास सांगतले. त्यावरून फिर्यादी यांनी मर्सी ग्रेस, जॉन केनेडी व अनिता चौधरी यांना संपर्क साधून वेगवेगळया पाच बॅक अकाउंट व एक पेटीम अकाउंटमध्ये वेळोवेळी एनईएफटी द्वारे रू. ३९,८०,०००/– इतकी रक्कम भरली. फिर्यादी यांनी रक्कम भरल्यानंतर सर्व इसमांचे मोबाइल क्रमांक बंद झाल्याने फिर्यादी यांना त्यांची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :– | श्री. प्रकाश नारायण जाधव, वय ४० वर्षे, |
| **चोरीस गेलेली मालमत्ता** | :– | रोख रक्कम रू. ३९,८०,०००/– ( एकोणचाळीस लाख, ऐंश |
| **हस्तगत मालमत्ता** | :– | रक्कम रू. ५,०७,०००/– ( पाच लाख सात हजार ) |

| | | |
|---|---|---|
| **आरोपी अटक व दिनांक** | **:—** | १) निरज रमेश वर्मा, वय २३ वर्षे,<br>२) साबीर सिकंदर, वय २१ वर्षे,<br>३) मनमोहन उदयचंद सिंग, वय २८ वर्षे,<br>४) चंद्रपाल नेतराम शर्मा, वय ४९ वर्षे,<br>५) आकीप शमशुद्दीन शेख, वय २३ वर्षे,<br>६) वसीम अहमद मुमताजमियाँ खान, वय ३२ वर्षे,<br>७) James amaobi obiegbulam, **(नायजेरीयन नागरिक),**<br>आरोपी क्र. ०१ ते ०३ दि.२९/१०/२०२० रोजी<br>आरोपी क्र. ०४ ते ०६ दि.३०/१०/२०२० रोजी<br>आरोपी क्र. ०७ दि.३१/१०/२०२० रोजी |

**तपास कौशल्य** :— सदरचा गुन्हा नोंद करण्यात आल्यानंतर आरोपींविषयी काहीही माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे सदरचे आरोपी हे सायबर गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाल्याने फिर्यादी यांनी त्यांची रक्कम भरलेले पाचही बॅक अकाउंट व एक पेटीम अकाउंट यांचे के.वाय.सी. व अकाउंट स्टेटमेंट प्राप्त करण्यात आले. प्राप्त अकाउंट स्टेटमेंटचा अभ्यास केल्यानंतर सदरची रक्कम ही पुन्हा वेगवेगळया अकाउंट वर्ग झाल्याचे दिसून आल्याने सदरची रक्कम ज्या वेगवेगळया अकाउंटला गेली अशा वेगवेगळया ६५ बॅक अकाउंटचे अकाउंट स्टेटमेंट व के.वाय.सी. मागविण्यात आले व त्यांचा अभ्यास करण्यात आला. त्याचवेळी सदरची रक्कम दिल्ली येथील वेगवेगळया एटीएमद्वारे काढण्यात आल्याचे दिसून आले. दिल्ली येथील बॅकांना संपर्क साधून त्यांच्याकडून एटीएम सेंटरचे फुटेज प्राप्त करण्यात आले. त्यामध्ये एकूण ९ ठिकाणच्या एटीएम सेंटरचे फुटेज प्राप्त झाले. सदर ९ एटीएम सेंटच्या फुटेजमध्ये एकच इसम प्रत्येक ठिकाणी रक्कम काढण्यास येत असल्याचे दिसून आले. त्यामुळे सदरचा इसम हा गुन्हयातील मुख्य आरोपींचा साथीदार असल्याचे निष्पन्न होत होते. सदर इसमाचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक हे दिल्ली येथे पाठविण्यात आले.

नमुद गुन्हयात फिर्यादी यांनी संपर्क साधलेले वेगवेगळे मोबाइल क्रमांक व के.वाय.सी. फॉर्मवरील उपलब्ध मोबाइल क्रमांक व आधारकार्डशी लिंक असलेले मोबाइल क्रमांक असे एकूण ५६ मोबाइल क्रमांकांचे सी.डी.आर, एस.डी.आर. व कॅफ फॉर्म प्राप्त करण्यात आले. तसेच पेटीएमद्वारे पाच मोबाइल क्रमांक यांचे रिचार्ज झालेले तपासात निषपन्न झाले. सदरचे रिचार्ज झालेले मोबाइल क्रमांक हे आरोपीचे असण्याची शक्यता वाटू लागल्याने त्यांची देखील सविस्तर माहिती मागविण्यात आली. अशाप्रकारे प्राप्त झालेले मोबाइल क्रमांकांची माहिती, बॅक खातेधारकांची माहिती, पेटीएमद्वारे प्राप्त माहिती यांचा पो.नि. पाडावे, स.पो.नि. लिंगे व म.पो.उ.नि पोटवडे यांचेकडून सखोल अभ्यास करण्यात आला.

त्याचवेळी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक आरोपी यांना निष्पन्न करून त्यांचा शोध घेण्याकरिता नॉर्थ वेस्ट दिल्ली, साउथ वेस्ट दिल्ली, नरेला, गोएला डेअरी, दिल्ली येथून जाऊन गोपनीयरित्या आरोपीविषयी माहिती घेत होते. परंतु मुख्य आरोपी याविषयी माहिती मिळून न आल्याने पोलीस पथक ही उपलब्ध माहिती घेऊन पुन्हा मुंबई येथे परत आले. मुंबई येथे पोलीस ठाण्यास परत

आल्यावर त्यांनी वरिष्ठांशी चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन घेऊन सखोल अभ्यास करून पोलीस अधिकारी व अंमलदार असे सात जणांचा पथक दिल्ली येथे पुन्हा रवाना झाले. त्यांनी दिल्ली येथे तीन वेगवेगळी पथके तयार करून स्थानिक पोलिसांची मदत घेऊन गुन्हयातील सातही आरोपींना पळून जाण्याची कोणतीही संधी न देता कमी मनुष्यबळात त्यांना ताब्यात घेऊन अटक केली.

अशाप्रकारे तपासी पथकाने आरोपींची कोणतीही माहिती उपलब्ध्द नसताना कमीत कमी मनुष्यबळात गुन्हयातील पाहिजे आरोपी यांना अटक करून प्रतिकूल परिस्थितीत त्यांना मुंबई येथे आणण्यात आले. व सदरचा गुन्हा दिनांक २९/१०/२०२० रोजी दाखल झाल्यावर सात दिवसात उघडकीस आणण्यात आला. तसेच सदर गुन्हयात एकूण रक्कम रू. ५,०७,०००/— एवढी रक्कम आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेली असून सायबर गुन्हे करणारे टोळीचा छडा लावून आंतरराज्यीय गुन्हे करणारे टोळीस अटक करून गजाआड केलेले आहे.

**डोंगरी पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | संदिप वसंत भागडीकर | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | शशीकांत बाबी पाडावे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | प्रकाश लक्ष्मण लिंगे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | महीला पोलीस उप निरीक्षक | द्वारका विलास पोटवडे | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो. ह. क्र. २९६७४ | विकास आनदंराव राजपुरे | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पो.शि.क्र. ०४०४१४ | भरत खेमा कदम | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पो.शि.क्र.०६१८६५ | अमित सिताराम करपाते | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.शि.क्र.०९०७२४ | योगेश भगवान गाढवे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.शि.क्र. ११०४२९ | मुकेश सुकलाल सोनवणे | प्रशस्तीपत्रक |

दिनांक ०४/०१/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" BEST CONVICTION OF THE MONTH "** **माहे नोव्हेंबर —२०२०** या याकरीता खाली नमुद पोलीस ठाणेची निवड करण्यात आलेली आहे.

## ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ नोव्हेंबर — २०२०

| | | |
|---|---|---|
| **०१** | **बोरीवली पालीस ठाणे परिमंडळ—११** | **गु.र.क्र. १००/१४ कलम ३०२, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ३४ सह १२० (ब) भादवि सह ४, २४ भाहका सह महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदा १९९९ कलम ३ (१) (प), ३ (२), ३ (४)** |

—: **“ आर्थिक व्यवहारातुन वैमनस्य ”** :—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्री. सुनिल सुरेश घाग, वय २९ वर्षे, यांचा भाऊ बळीत श्री. संदीप सुरेश घाग, वय २५ वर्षे, यास आर्थिक व्यवहारातुन झालेल्या वैमनस्यातुन बोरीवली पोलीस ठाणे हद्दीतील चाचा नेहरु गार्डन, ए—१ फोटो स्टुडीओच्या समोर, साईबाबा नगर, बोरीवली (प), मुंबई—९२ येथे आरोपी नामे १) कैलास उर्फ महेश अशोक पांचाळ, वय ३३ वर्षे, २) सुरेश नरसय्या देशवाणी, वय २९ वर्षे, ३) अरविंद अशोक साळवी, वय २५ वर्षे व ४) गणेश बळीराम देसाई, वय २७ वर्षे यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन, प्राणघातक हत्यारासह सज्ज होवुन यातील मयत इसम नामे संदीप सुरेश घाग, वय २५ वर्षे यांच्या मानेच्या डाव्या बाजुस डोक्यावर व शरीरावर प्राणघातक हत्याराने वार करुन जिवे ठार मारले म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. सुनिल सुरेश घाग, वय २९ वर्षे, |
| बळीत/मयत | :— | संदीप सुरेश घाग, वय २५ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) कैलास उर्फ महेश अशोक पांचाळ, वय ३३ वर्षे,<br>२) सुरेश नरसय्या देशवाणी, वय २९ वर्षे,<br>३) अरविंद अशोक साळवी, वय २५ वर्षे<br>४) गणेश बळीराम देसाई, वय २७ वर्षे<br>दिनांक १५/०३/२०१४ |
| निकाल दिनांक | :— | **०७/११/२०२० रोजी** |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | विशेष न्यायालय, कोर्ट क्र. ५५, सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांनी<br>**आरोपी क्र. १)** कैलास उर्फ महेश अशोक पांचाळ, वय ३३ वर्षे यास कलम १२० (ब), १०९, ३०२ भादवि अन्वये जन्मठेप व २०,०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ वर्षाची साधी कैद, एमसीओसी कलम ३ (२), ३ (४) अन्वये जन्मठेप व रुपये पाच लाख दंड व दंड न भरल्यास ०३ वर्षे साधी कैद, कलम ३, ४ भाहका अन्वये ३ वर्षे कैद व रुपये ५०००/— दंड,<br>**आरोपी क्र. २)** सुरेश नरसय्या देशवाणी, वय २९ वर्षे यास कलम १२० (ब), १०९, ३०२ भादवि अन्वये जन्मठेप व २०,०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ वर्षाची साधी कैद, एमसीओसी कलम ३ (१)(प), ३ (२), ३ (४) अन्वये जन्मठेप |

| | | |
|---|---|---|
| | | व रुपये पाच लाख दंड व दंड न भरल्यास ०३ वर्षे साधी कैद, कलम ३, ४ भाहका अन्वये ३ वर्षे कैद व रुपये ५०००/— दंड,<br><br>**आरोपी क्र. ३)** अरविंद अशोक साळवी, वय २५ वर्षे यास कलम १२० (ब), १०९, ३०२ भादवि अन्वये जन्मठेप व २०,०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ वर्षोची साधी कैद, एमसीओसी कलम ३ (१)(प), ३ (२), ३ (४) अन्वये जन्मठेप व रुपये पाच लाख दंड व दंड न भरल्यास ०३ वर्षे साधी कैद, कलम ३, ४ भाहका अन्वये ३ वर्षे कैद व रुपये ५०००/— दंड,<br><br>**आरोपी क्र. ४)** गणेश बळीराम देसाई, वय २७ वर्षे यास कलम १२० (ब), १०९, ३०२ भादवि अन्वये जन्मठेप व २०,०००/— दंड व दंड न भरल्यास ०२ वर्षोची साधी कैद, एमसीओसी कलम ३ (१)(प), ३ (२), ३ (४) अन्वये जन्मठेप व रुपये पाच लाख दंड व दंड न भरल्यास ०३ वर्षे साधी कैद, कलम ३, ४ भाहका अन्वये ३ वर्षे कैद व रुपये ५०००/— दंड अशी शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाचा परिपुर्ण तपास करुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा गोळा करुन मा. महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रीत कायद्याअंतर्गत स्थापित विशेष न्यायालय, कोर्ट क्र. ५५, सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांचे न्यायालयात विशेष एमसीओसी केस क्र. ११/२०१४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

तत्कालीन तपासी अधिकारी १) श्री. रविंद्र परेमेश्वर अडाणे, तत्कालीन पोलीस निरीक्षक (सध्या नेमणुक कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई), २) जालींदर सर्जेराव पवार, पोउनि (सध्या नेमणुक कांदिवली पोलीस ठाणे), ३) अनिल भालचंद्र मेढेकर, पोउनि, पैरवी अधिकारी (सध्या नेमणुक दिंडोशी पोलीस ठाणे) व ४) विजय ज्ञानु घनवट, पो.ह.क्र. ३०९८५, बोरीवली पोलीस ठाणे, मुंबई समन्स वॉरंट कारकुन यांनी यातील फिर्यादी, साक्षीदार, पंच यांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन मा. न्यायालयात साक्षीकरीता वेळेवर हजर ठेवले. त्याचप्रमाणे गुन्हयातील आरोपीतांविरुध्दचे पुरावे सक्षमपणे मा. न्यायालयासमोर मांडण्यास मदत केली. त्यामुळे सदर गुन्हयात मा. जज श्री. राहुल भोसले, अति. सत्र न्यायाधिश, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रीत कायद्याअंतर्गत स्थापित विशेष न्यायालय, कोर्ट क्र. ५५, सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांनी अटक आरोपीतांना शिक्षा सुनावली आहे.

**बोरीवली पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | रविंद्र परेमेश्वर अडाणे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | जालींदर सर्जेराव पवार, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | अनिल भालचंद्र मेढेकर | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.ह.क्र. ३०९८५, | विजय ज्ञानु घनवट | प्रशस्तीपत्रक |